# राष्ट्रीय केमिकल्स अॅण्ड फर्टिलायझर्स लि.

**( भारत सरकार चा उपक्रम )**

**प्रशासकीय भवन, चेंबूर, मुंबई - 400 074.**

**<u>कंपनीच्या ट्रॉम्बे युनिट करिता ऑपरेटर ट्रेनी</u>**
**<u>आणि कनिष्ठ फायरमन श्रेणी III (एस.टी. प्रवर्ग) पाहिजेत.</u>**

## अ] ऑपरेटर ट्रेनी :

I) <u>पदांची संख्या</u> : **34**

II) **<u>शैक्षणिक पात्रता</u>** : बीएस.सी.(रसायनशास्त्र) आणि अटेंडंट ऑपरेटर {ए.ओ.(सी.पी.)} या ट्रेड मध्ये एन.सी.व्ही.टी. **किंवा** केमिकल इंजिनियरिंग डिप्लोमा नंतर अप्रँटीसेस अॅक्ट 1961 (सुधारीत 1973) अंर्तगत एक वर्षाचे प्रशिक्षण पूर्ण केलेले असावे. या संबंधीचे BOAT (Board of Apprenticeship Training) ने जारी केलेले प्रमाणपत्र आवश्यक **किंवा** सँडविच पॅटर्न अंतर्गत केमिकल इंजिनियरिंग मधे डिप्लोमा (4 वर्ष कालावधीचा पूर्ण वेळ अभ्यासक्रम).

III) <u>राखीव जागांचा तपशील</u> :

| **सामान्य** (General) UR | **अनुसूचित जाती** (SC) | **अनुसूचित जमाती** (ST) | **इतर मागास वर्ग** (OBC) | **एकूण पदांची संख्या** |
|---|---|---|---|---|
| 16 | 05 | 04 | 09 | 34 |

IV) **<u>गुणांची टक्केवारी</u>** : बी.एस.सी. / डिप्लोमा केमिकल इंजिनियरिंग यामध्ये किमान 50%. (आरक्षित जागांसाठी अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना गुणांच्या टक्केवारीत 5% सूट देण्यांत येईल.

V) **<u>वयोमर्यादा</u>** : 01.03.2013 रोजी सामान्य संवर्गाकरिता कमाल वय 27 वर्षे.
सरकारी निर्देशानुसार आरक्षित जागांसाठी खालील प्रमाणे वयामध्ये सूट देण्यांत येईल.

1. अनुसुचित जाती (SC) व अनुसूचित जमाती (ST) साठी - 5 वर्षे
2. इतर मागास वर्गा (OBC) साठी - 3 वर्षे.
3. 1984 च्या दंगलग्रस्तांची मुले व कुंटुबिय - 5 वर्षे
4. माजी सैनिक (Ex-Serviceman) - सरकारी निर्देशानुसार.

VI) **<u>निवडीची पध्द्त</u>** : पात्र उमेदवारांची वैयक्तिक मुलाखतीद्वारे निवड केली जाईल.

VII) **<u>प्रशिक्षण कालावधी</u>** : एक वर्ष.

VIII) **<u>विद्यावेतन आणि नियुक्ती</u>**: एक वर्षाच्या प्रशिक्षण कालावधीत रू.9000/- दरमहा (एकत्रित) विद्यावेतन दिले जाईल. प्रशिक्षण कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण केल्यावर ऑपरेटर ट्रेनीजना ऑपरेटर श्रेणी III मध्ये रू.8650-19000 च्या वेतनश्रेणीत ( आरंभीच्या मूळ वेतनावर आणि इतर देय भत्ते ) सामावून घेतले जाईल.

IX) **<u>अन्य लाभ</u>** : प्रशिक्षण कालावधी दरम्यान स्वत:साठी कंपनीच्या वसतिगृहात मोफत निवास, मोफत बोर्डींग, स्वतःसाठी आर.सी.एफ च्या रुग्णालयात मोफत वैद्यकीय सेवा आणि स्पोर्टस क्लब सुविधांचा समावेश असेल.

**फक्त अनुसूचित जमातीच्या (Scheduled Tribe) उमेदवारांसाठी विशेष सूचना** : ज्या उमेदवारांनी बी.एस.सी. (रसायनशास्त्र) अभ्यासक्रमामध्ये तीन वर्षाच्या कालावधीत भौतिकशास्त्र हा एक विषय घेऊन कमीतकमी 45 टक्के गुण मिळवून पदवी घेतली, पण अटेंडंट ऑपरेटर {ए.ओ.(सी.पी.)} या ट्रेड मध्ये एन.सी.व्ही.टी. परीक्षा उत्तीर्ण केलेली नसेल **किंवा** केमिकल इंजिनियरिंग डिप्लोमा कमीतकमी 45 टक्के मिळवून उत्तीर्ण केल्यानंतर अप्रँटीसेस ॲक्ट 1961 अंतर्गत एक वर्षाचे प्रशिक्षण घेतलेले नसेल, असे अनुसूचित जमातीचे उमेदवार 'कंपनी अप्रँटीस (एस.टी.) - केमिकल' हया पदासाठी अर्ज करू शकतात. अशा उमेदवारांचे वय 01.03.2013 रोजी 30 वर्षापेक्षा जास्त नसावे.

ऑपरेटर ट्रेनी पदांमधील अनुसूचित जमातीसाठी असलेल्या राखीव जागा भरण्यासाठी अप्रँटीसशीप न केलेल्या उमेदवारांना 'कंपनी अप्रँटीस (एस.टी.) - केमिकल' हया पदाच्या निवडीसाठी वैयक्तिक मुलाखतीसाठी बोलाविण्यात येईल.

निवड झाल्यास 'कंपनी अप्रँटीस' हया पदासाठी रू.5000/- दरमहा (एकत्रित) विद्यावेतनावर त्यांची अटेंडंट ऑपरेटर [ए.ओ.(सी.पी.)] या ट्रेड मध्ये एन.सी.व्ही.टी. परीक्षा उत्तीर्ण करेपर्यंत / अप्रँटीस ॲक्ट 1961 (सुधारित 1973) अंतर्गत एक वर्षाचे प्रशिक्षण पूर्ण करेपर्यंत नियुक्ति करण्यात येईल. त्यानंतर त्यांची 'ऑपरेटर ट्रेनी' हया पदासाठी रू.9000/- दरमहा (एकत्रित) विद्यावेतनावर एक वर्षाच्या प्रशिक्षण कालावधीसाठी नियुक्ति करण्यात येईल. प्रशिक्षण कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण केल्यावर सदर ऑपरेटर ट्रेनीजना ऑपरेटर श्रेणी III हया पदावर रू.8650-19000 च्या वेतनश्रेणीत ( आरंभीच्या मूळ वेतनावर आणि इतर देय भत्ते ) सामावून घेतले जाईल.

## ब] कनिष्ठ फायरमन श्रेणी III (एस.टी. प्रवर्ग) :

I) <u>पदांची संख्या</u> : **01 ( अनुशेष भरण्याकरता फक्त अनुसूचित जमाती साठी राखीव** ).

II) **<u>शैक्षणिक पात्रता</u>** : एसएससी उत्तीर्ण + फायर फायटिंग प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम पूर्ण + भारी (अवजड) वाहन चालविण्यांच्या वैध परवाना (HMVL). (एच.एम.व्ही. परवाना नसलेले उमेदवार अर्ज करू शकतात. पण निवड झाल्यास उमेदवारास परवाना मिळेपर्यंत सेवेत नियमित केले जाणार नाही.)

III) **<u>वयोमर्यादा</u>** : 01.03.2013 रोजी कमाल वय 30 वर्षे.

IV) **<u>निवड</u>** : पात्र उमेदवारांना शारीरिक मापदंड निर्धारण / ट्रेड टेस्ट आणि वैयक्तिक मुलाखती करीता बोलाविण्यांत येईल. फक्त तेच उमेदवार जे शारीरिक मापदंड पूर्ण करीत असतील आणि त्यांना किमान शारीरिक क्षमताच्या चाचणीत (ट्रेड टेस्ट) "फिट" (पात्र) घोषित केले जाईल, फक्त अशा उमेदवारांच्याच निवडी साठी वैयक्तिक मुलाखती घेण्यात येईल.

V) **<u>नियुक्ति</u>** : कनिष्ठ फायरमैन श्रेणी III ची नियमित नियुक्ति रू.7600-15250 हया वेतनश्रेणी मध्ये आरंभीचे मूळवेतन व अन्य लागू भत्यावर ट्रॉम्बे युनिटच्या संयंत्रा करीता करण्यांत येईल.

उमेदवाराला फायर फायटिंग उपकरणे / साधने चालविण्यांचे पूर्ण ज्ञान असणे आवश्यक आहे. राज्य / केंद्र सरकार तर्फे चालविण्यात येणा-या राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्रा द्वारे (एस.एफ.टी.सी.) किंवा नॅशनल फायर सर्विस कॉलेज, नागपूर येथून सहा महिन्यांचा फायर फायटिंग प्रशिक्षण अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र आवश्यक आहे. उमेदवार शारिरीक दृष्टया तंदुरूस्त व आपत्कालीन, तणावग्रस्त कामे निभावण्यात कार्यक्षम असले पाहिजेत.

**VI) शारीरिक मापदंड** :

उंची : शूज न घालता 165 सें.मी.
वजन : 50 किलो (किमान)
छाती : (फुगविल्या शिवाय : 81.5 सें.मी. आणि फुगविल्या नंतर 85 से.मी.)
सामान्य दृष्टी :6/6.
रंगांधळेपणा व रातआंधळेपणा नसावा.

## अर्ज कसा करावा :

अनुसूचित जाति / जमाती करीता अर्ज प्रक्रिया शुल्क आकारण्यात येणार नाही. सामान्य व इतर मागासलेल्या जातीचा उमेदवारांना रू.100/- अर्ज प्रक्रिया शुल्क आपल्या जवळच्या भारतीय स्टेट बँक मध्ये जमा करावे लागेल. ठराविक खात्यांत योग्य रीतिने फी जमा व्हावी म्हणून कंपनीच्या **www.rcfltd.com** हया वेबसाईट वरील रिक्रुटमेंट सेकशनवर क्लिक करून चलानचे प्रिंट घ्यावे. हे प्रिंट घेऊन जवळच्या एसबीआयच्या शाखेमधे जाऊन अर्ज प्रक्रिया शुल्क जमा करावे. पैसे प्राप्त झाल्यानंतर बँक उमेदवाराला एक विशिष्ट जरनल क्रमांक व ब्रँच कोड देण्यात येईल. हा जरनल क्रमांक उमेदवारांनी आपल्या अर्जा वर लिहावा. हया जरनल क्रमांकाचा दुरूपयोग न होण्यासाठी हा जरनल क्रमांक गोपनीय ठेवावा. जर उमेदवारांनी चुकीच्या खात्यात फी जमा केली तर त्यास कंपनी जबाबदार असणार नाही. अर्ज फी अन्य कुठल्या ही स्वरूपात स्वीकारली जाणार नाही. अर्जा सोबत एसबीआय बँक चलान ची प्रत जोडावी लागेल. वरील अर्ज प्रक्रिया शुल्क कुठल्याही कारणास्तव परत करण्यात येणार नाही.

सोबत दिलेल्या विहित नमुन्या मधील अर्जासोबत अर्ज प्रक्रिया शुल्क म्हणून **'राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फर्टिलायझर्स लिमिटेड'** (**Rashtriya Chemicals & Fertilizers Ltd.**) **खाते नं. 32376431341 (Account No. 32376431341)** मध्ये वरीलप्रमाणे रू.100/- जमा केल्या नंतर मूळ चलान जोडून अर्ज मुख्य व्यवस्थापक (मानव संसाधन) - युनिट, रुम नं. 03, तळ मजला, आर.सी.एफ. लि., प्रशासकीय भवन, चेंबूर, मुंबई - 400 074 या पत्यावर पाठवावा. अर्जासोबत वयाचा दाखला (शालांत परिक्षा उत्तीर्णतेचे प्रमाणपत्र), जातीचे प्रमाणपत्र, शैक्षणिक पात्रतेची सर्व वर्षांची गुणपत्रके (Mark Sheets) व प्रमाणपत्रे (Certificates) आणि अनुभव असल्यास त्याची प्रमाणपत्रे यांच्या साक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे. कृपया अर्ज भरण्यापूर्वी खालील माहिती काळजीपूर्वक वाचावी.

**अर्ज स्विकारण्याची अंतिम तिथी 22 मार्च, 2013 आहे**.

## सर्वसाधारण सूचना:

1) पात्र उमेदवारांना शारीरिक मापदंड निर्धारण / ट्रेड टेस्ट, वैयक्तिक मुलाखतीची तारीख, वेळ व ठिकाणाबद्दल पोस्टाद्वारे किंवा त्यांनी अर्जात दिलेल्या ईमेल ॲड्रेस द्वारे कळविण्यांत येईल. चुकीचा / अपूर्ण पत्ता, अवैध ईमेल आयडी, तसेच उमेदवार दिलेल्या पत्यावर रहात नसल्याने पत्र / ईमेल न मिळाल्यास / उशीरा मिळाल्यास कंपनी जबाबदार राहणार नाही.

2) इंजिनियरिंग ग्रॅज्युएट तसेच जाहिरातीत दिलेल्या शैक्षणिक पात्रतेखेरीज अन्य शैक्षणिक पात्रता ज्या आधारे उमेदवार जाहिरातीत दिलेल्या वेतनश्रेणीपेक्षा वरील वेतनश्रेणीसाठी पात्र ठरत असेल, तर अशा उमेदवारांचा जाहिरातीत दिलेल्या वेतनश्रेणीसाठी अर्ज स्विकारला जाणार नाही. तसेच पदविकेच्या (Diploma) अंतिम वर्षात शिक्षण घेत असलेले उमेदवार आणि निकालाच्या प्रतिक्षेत असलेले विद्यार्थी अर्ज करण्यास पात्र नाहीत.

3) ज्या उमेदवारांकडे BOAT (Board of Apprenticeship Training) ने जारी केलेले प्रमाणपत्र नसेल, परंतु कंपनी ने जारी केलेले अप्रँटीसशिप चा रजिस्ट्रेशन नंबर आणि एक वर्ष अप्रँटीसशिप चा कालावधी पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र असे उमेदवार अर्ज करू शकतात. मात्र, वैयक्तिक मुलाखतीस येताना त्याना BOAT (Board of Apprenticeship Training) ने जारी केलेले प्रमाणपत्र आणावे लागेल. जर डिप्लोमा गुणपत्रिका, CGPA/ OGPA किंवा लेटर ग्रेडवर दर्शवित असेल तर, युनिव्हर्सिटी / संस्थेद्वारा अंगीकारण्यात आलेल्या प्रमाणपद्वतींनुसार अर्जामध्ये समतुल्य गुणांची टक्केवारी / शंभर पैकी गुण दर्शविण्यात यावे.

4) अपूर्ण, स्वाक्षरी न केलेले, विहित नमुन्यांत न भरलेले व चलान न जोडलेले अर्ज तसेच जातीचे प्रमाणपत्र, शैक्षणिक पात्रता व अनुभव प्रमाणपत्र यांच्या साक्षांकित प्रति नसलेले आणि अर्ज स्वीकारण्यांच्या अंतिम तारखेनंतर आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत व या संबंधीचा कोणताही स्वरुपाचा पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही. अर्ज शुल्क फक्त चलान द्वारेच वर दिलेल्या खात्यामधे भरावे. मनीऑर्डर, डिमांड ड्राफ्ट, पोस्टल ऑर्डर, पे आर्डर, चेक अथवा अन्य स्वरूपात अर्ज शुल्क स्विकारले जाणार नाही.

5) अनुसूचित जाती / अनुसुचित जमाती / इतर मागासवर्गीय / शरीरीक विकलांग यांच्या संदर्भात विहीत नमुन्यांतील सक्षम प्राधिका-यांने जारी केलेले प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. इतर मागासवर्ग (OBC) उमेदवारांनी वित्तीय वर्ष 2012-13 साठी केंद्र सरकारच्या विहित नमुन्या मध्ये काढलेले नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र अर्जा बरोबर जोडणे आवश्यक आहे. अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती / इतर मागासवर्गीय अर्जदारांनी जाती वैधता प्रमाणपत्र (Caste Validity Certificate) असल्यास त्याची प्रत जोडावी अथवा नेमणूकी पूर्वी जाती वैधता प्रमाणपत्रा साठी केलेल्या अर्जाची पावती प्रस्तुत करावी.

6) अर्जदारांनी अर्ज पाठविताना पाकीटावर डाव्या बाजूला ज्या पदासाठी अर्ज केला आहे त्या पदाचे नाव लिहिणे आवश्यक आहे.

7) अर्ज पाठविण्याची मुदत संपल्यानंतर कुठल्याही स्वरुपाचा पत्र व्यवहार लिखित स्वरूपात वा दूरध्वनी द्वारे संपर्क करू नये. मुलाखतीची तारीख व अन्य सूचने करिता उमेदवारानी कंपनी कडून सूचनेची प्रतिक्षा करावी.

8) कनिष्ठ फायरमनच्या भरतीकरता फक्त तेच उमेदवार जे शारीरिक मापदंड पूर्ण करीत असतील आणि त्यांना किमान शारीरिक क्षमताच्या चाचणीत (ट्रेड टेस्ट) "फिट" (पात्र) घोषित केले जाईल, अशा उमेदवारांच्याच फक्त निवडी साठी वैयक्तिक मुलाखती घेण्यात येईल. वैयक्तिक मुलाखतीस बोलाविलेल्या अर्ज करणा-या **मुंबई बाहेरील** पात्र उमेदवारांना व्दितीय वर्गाचे रेल्वे / बसचे जवळच्या मार्गाचे येण्या जाण्याचे तिकिटांचे भाडे, तिकिटे कंपनी कडे जमा केल्यावर देण्यात येईल.

9) सध्या सरकारी, निमसरकारी आस्थापना किंवा केंद्र व राज्य शासनाच्या उपक्रमांच्या सेवेत असलेल्या उमेदवारांनी अर्ज करतांना आपल्या विभागांमार्फत (Through Proper Channel) अर्ज करावेत अथवा आपल्या विभागाकडून ना हरकत प्रमाणपत्र (NOC) मुलाखतीच्या वेळी सादर करावेत.

10) वरील पदे अपंग प्रवर्ग (PWD - Persons with Disability) या अंर्तगत समाविष्ट नाही.

11) निवड करण्यासाठी विचाराधीन उमेदवारांना वैद्यकीय पात्रता परीक्षा पास करावी लागेल. निवड झालेल्या उमेदवारांची नेमणूक सध्या ट्रॉम्बे युनिट मध्ये करण्यात येईल. तथापि, कंपनीच्या गरजेनुसार कंपनीच्या अन्य युनिट मध्ये स्थानांतरण करण्याचा अधिकार व्यवस्थापना कडे राहील. निवड झालेल्या सर्व उमेदवारांना प्लांटमध्ये पाळीमध्ये (shift duties) काम करावे लागेल.

12) कनिष्ठ फायरमनच्या पदासाठी खाजगी संस्था मधून फायर फायटिंग प्रशिक्षण अभ्यासक्रम पूर्ण करणा-या (राज्य / केंद्र सरकार द्वारा चालविण्यांत येणारे अग्निशमन प्रशिक्षण केंद्रे किवां नॅशनल फायर सर्विस कॉलेज, नागपूर या खेरीज अन्य संस्था / इन्स्टिटयूट मधील) उमेदवारानी अर्ज करू नयेत.

13) भरती संबंधी कंपनीचा निर्णय अंतिम असेल आणि कोणत्याही उमेदवाराशी हया भरती संबंधी वैयक्तिक पत्रव्यवहार केला जाणार नाही.

14) व्यवस्थापन काहीही कारण दिल्याशिवाय वरीलपैकी कुठलेही किंवा सर्व पदे न भरण्याचा तसेच उमेदवार योग्य संख्येत निवडीसाठी उपलब्ध होण्याकरता पात्रता निकष कडक / शिथिल करण्याचा अधिकार राखून ठेवित आहे.

15) उमेदवाराच्या वतीने निवडीसाठी कुठल्याही व्यक्ति / अधिकारी / संस्थेकडून / यंत्रणेकडून शिफारस किंवा दबाब आल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

**अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख 22 मार्च, 2013 असेल.**

**मुख्य व्यवस्थापक (मानव संसाधन) - युनिट**
**दूरध्वनी क्र. 022- 25522705**

# अर्जाचा नमुना

(संदर्भ : वृत्तपत्र जाहीरात दिनांक ___________ )

**पदाचे नाव :**

कृपया पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटवा

**पूर्ण नांव :**

| आडनाव | नाव | वडीलांचे नाव |
|---|---|---|
| | | |

**जन्म दिनांक :**

| दिनांक | महिना | वर्ष |
|---|---|---|
| | | |

**वैवाहिक स्थिती :**

**लिंग :**

| पुरुष | स्त्री |
|---|---|
| | |

**पत्रव्यवहारासाठीचा सध्याचा पत्ता :**

पिन कोड ::

**टेलिफोन / मोबाइल नंबर :**

**इ-मेल ॲड्रेस :**

**अधिवासी राज्य :**

**धर्म :**

**अनुसुचित जाती / जनजाती / इतर मागासवर्गीय / सामान्य / माजी सैनिक :**

**ओबीसी असल्यास नॉन क्रीमीलेअर गटात मोडत असल्याचे हल्लीचे प्रमाणपत्र आहे का ?**

आहे / नाही

**1984 च्या दंगलगस्तांच्या मुले व कुंटुबिय आहे का ?**

आहे / नाही

**शारीरिक मानदंड (फक्त फायरमन साठी) :**

| ऊंचाई | वजन | छाती | |
|---|---|---|---|
| | | सामान्य | विस्तारीत |
| ______ से.मी. | _______ किलो | ______ से.मी. | ______ से.मी. |

**अवजड वाहन चालविण्याचे लायसन्स (फक्त फायरमन साठी) :**

| | |
|---|---|
| लायसन्स क्रमांक : ____________________ | दिनांक ____________________ पर्यत वैधता |

**फायर फायटिंग ट्रेनिंग कोर्स ज्या संस्थेतून केला त्या संस्थेचे नाव (फक्त फायरमन साठी) :**

| |
|---|
| |

**संस्थेची संलग्नता (फक्त फायरमन साठी) :**

| |
|---|
| केंद्रशासित / राज्यशासित / नॅशनल फायर सर्विस कॉलेज, नागपूर |

**शैक्षणिक पात्रतेचा तपशील :**

| **परिक्षेचे नांव** | **मुख्य विषय** | **टक्के वारी** | **बोर्ड / विद्यापीठ** | **उत्तीर्ण होण्याचे वर्ष** |
|---|---|---|---|---|
| एस.एस.सी. | | | | |
| एच.एस.सी. | | | | |
| बीएस.सी (रसायनशास्त्र किंवा डिप्लोमा (केमिकल इंजिनियरिंग) | | | | |
| एन.सी.व्ही.टी / ॲप्रेंटीसेस प्रशिक्षण (BOAT) | | | | |
| फायर फायटिंग ट्रेनिंग कोर्स **(फक्त फायरमन साठी)** | | | | |
| अन्य (असल्यास) तपशील द्यावा | | | | |

**अनुभवाचा तपशील (लागू असल्यास) :**

| **कंपनीचे नाव** | **पद** | **अनुभवाचा कालावधी (वर्षे / महिने / दिवस)** | |
|---|---|---|---|
| | | **पासून** | **पर्यत** |
| | | | |
| | | | |

| | |
|---|---|
| **सेवायोजन रजिस्ट्रेशन नं. प्रत जोड्ली आहे :** | आहे / नाही (असल्यास रजिस्ट्रेशन नं.____________________ |
| **छंद / कलागुण :** | |
| **बँकेचे चलान :** | जोडले आहे / नाही |
| **चलान मधील जरनल क्रमांक :** | |
| **चलानची दिनांक :** | |

## वचन

मी या द्वारे जाहीर करतो की वर दिलेली माहिती माझ्या ज्ञानाप्रमाणे खरी आहे आणि खोटी माहिती दिल्यास माझी उमेदवारी अपात्र ठरेल ह्याची मला पूर्ण जाणीव आहे.

( उमेदवाराची सही )

दिनांक :

स्थळ :

**प्रति,**

**मुख्य व्यवस्थापक (मानव संसाधन) - इकाई**
**आर.सी.एफ. लि.,**
**प्रशासकीय भवन, तळ मजला,**
**चेंबूर, मुंबई - 400 074.**

**संलग्न : फोटोस्टेट प्रति ( कृपया √ खूण करावी )**

1. वयाचा दाखला (एस.एस.सी. प्रमाणपत्र).
2. जाती प्रमाणपत्र व जाती वैधता प्रमाणपत्र. (अनुसूचित जाती, जमाती/ओबीसी.)
3. ओबीसी नॉन क्रीमी लेयर गटात मोडत असल्याचे हल्लीचे (वर्ष 2012-13) प्रमाणपत्र.
4. सर्व वर्षाच्या प्रमाणपत्र/गुणपत्रिका एस.एस.सी. / एच.एस.सी. / बी.एस.सी. किंवा इंजिनियरिंग डिप्लोमा)
5. फायर फायटिंग ट्रेनिंग कोर्सचे प्रमाणपत्र (फक्त फायरमन साठी).
6. एन.सी.व्ही.टी. किंवा BOAT ट्रेनिंग प्रमाणपत्र (ऑपरेटर ट्रेनीजकरीता).
7. अनुभव प्रमाणपत्र (लागू असल्यास).
8. मूळ चलान (कंपनीची प्रत्र).
9. अवजड वाहन चालविण्याच्या लायसन्सची प्रत्र (फक्त फायरमन साठी).

**सूचना : कृपया मूळ प्रमाणपत्रे अर्जासोबत पाठवू नयेत.**

---XXX---